# T16/AGR209/EE/20160305

**वेळ : 3 तास** **गुण : 80**

**सूचना :**

1) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
2) प्रत्येक उप-प्रश्न पाच गुणांचा आहे.
3) प्रत्येक उप-प्रश्नाचे उत्तर 75 ते 100 शब्दांत लिहा.
4) पहिल्या ओळीमध्ये प्रश्न क्रमांक आणि उपप्रश्न लिहिल्यानंतर उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.

1. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) भाजीपाला उत्पादनातील समस्या कोणत्या आहेत ते लिहा. 5

ब) परस बाग म्हणजे काय ते सांगून त्याचे महत्त्व स्पष्ट करा. 5

क) विविध हवामानात येणाऱ्या भाजीपाला पिकांचे वर्गीकरण करा. 5

ड) भाजीपाला पिकाचे खाण्यायोग्य भागानुसार वर्गीकरण करा. 5

इ) परस बागेसाठी विविध हंगामात कोणत्या प्रकारच्या पिकांची निवड करावी ? 5

2. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) भाजी पीकातील अभिवृद्धीच्या पद्धती लिहा. 5

ब) भाजीपाला बियाण्यांचे विविध प्रकार वर्णन करा. 5

क) भाजीपाला बियाण्याला करावयाच्या उगवणपूर्व प्रक्रियाची माहिती लिहा. 5

ड) भाजीपाल्याच्या रोपवाटीकेसाठी जागेची निवड व वाफे तयार करण्याच्या पद्धतीची माहिती द्या. 5

इ) भाजीपाला पिकासाठी वापरण्यात येणाऱ्या गृहांचे प्रकार लिहा. 5

3. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) भाजीपाला पिक लागवडीच्या पद्धती लिहून कोणत्याही एका पद्धतीची थोडक्यात माहिती लिहा. 5

ब) भाजीपाला पिकांमधील आंतर पीक पद्धतीचे फायदे लिहा. 5

क) भाजीपाला पिकासाठी पीक पोषक अन्नद्रव्यांची माहिती लिहा. 5

ड) भाजीपाला पिकांना पाणी देण्याच्या पद्धती कोणत्या ते लिहा. 5

इ) बटाटे व वांगी पिकांच्या रोग व किड प्रतिबंधक जाती लिहा. 5

4. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) भाजीपाला पिक संरक्षण (एकात्मिक) योजनेमुळे कोणते फायदे होतात ? 5

ब) टोमॅटो व वांगी पिकासाठी कोणती तणनाशके वापरतात ते सविस्तर लिहा. 5

क) टोमॅटो व ढोबळी मिरची पिकाला आधार का देतात त्याची कारणे लिहा. 5

ड) फळभाजी पिकातील फळधारणा कमी होण्याची कारणे द्या. 5

इ) भाजीपाला पिकांमध्ये संजीवकांचा उपयोग कशासाठी होतो ते लिहा. 5